# डेलनेट : डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क आंतरग्रंथालयीन देवघेव वाचन साहित्याचे एक उपयुक्त स्त्रोत


**डॉ. प्रकाश विजय बर्वे**
सहायक ग्रंथपाल, ग्रंथालय आणि माहिती स्त्रोत केंद्र
Email : prakashbarve123@gmail.com
**डॉ. मधुकर शेवाळे**
प्रमुख, ग्रंथालय आणि माहिती स्त्रोत केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
Email : librarian@ycmou.digitaluniversity.ac



## सारांश

**प्रस्तुत लेखा मध्ये डेलनेट :** डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क आंतरग्रंथालयीन देवघेव करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या डेलनेट या अशासकीय ग्रंथालय नेटवर्कच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या वाचन साहित्याचे माध्यमातून देण्यात येत असलेल्या सेवा आणि कार्यप्रणाली या संदर्भात माहिती देण्याचा मानस आहे.



## संज्ञा: डेलनेट (DELNET), आंतरग्रंथालयीन, देवघेव


## प्रस्ताविक

डेव्हलपिंगलायब्ररी नेटवर्क या अशासकीय संस्थेची स्थापना १९८८ मध्ये झाली. १९९२ मध्ये हिला सोसायटी म्हणून नोंदणीकृत करण्यात आले.आज राष्ट्रीय पातळीवर विविध ग्रंथाल्यांमध्ये विखुरलेल्या वाचन साहीत्यासाठी संयुक्त तालिका (Union Catalogue) तयार करून, त्याच बरोबर संयुक्त नियतकालिके यादी आणि डेटाबेसच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाच्या सहायाने विद्यार्थी, संशोधक, तज्ज्ञ अणि सामान्य जनतेसाठी वाचन साहीत्याचे भांडार त्यांना



सभासदत्व देऊन खुले करण्यात आलेले आहे. या नेटवर्कच्या माध्यमातून उपलब्ध होणारे वाचनसाहित्य, नेटवर्क ची कार्यप्रणाली, उद्दिष्टे, सभासदत्व, कार्यशाला परिषद, माहिती तंत्रज्ञान, संगणक प्रणाली, उपयोजन आदिबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. जुन्या दिल्ली लायब्ररी नेटवर्कचे आजच्या डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क या विस्ताराचा आढावा या प्रस्तुत लेखात देण्याचा प्रयत्न केलेला आहे .

## डेलनेट (DELNET) ची ऐतिहासिक पार्श्वभूमी

दिल्ली डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क या अशासकीय संस्थेची स्थापना १९८८ मध्ये झाली तर १९९२ मध्ये भारत सरकारच्या राष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान प्रणाली अर्थात (नीसाट) NATIONAL INFORMATION SYSTEM FOR SCIENCE TECHNOLOGY द्वारा पुरस्कृत हिला सोसायटी म्हणून नोंदणीकृत करण्यात आले. भारत सरकारचे सुचना विज्ञान केंद्र NIC,नियोजन आयोग भारत सरकार, आणि इंडिया इंटरनेशनल सेंटर नवी दिल्ली, यांनी या संस्थेला चालना दिली. ग्रंथालय क्षेत्रात विकसित होणारे जाळे आणि उपलब्ध वाचन साहित्याची संगणक नेटवर्कच्या आणि काही अंशी प्रत्यक्ष स्वरूपात देवघेव करणे आणि या माध्यमातून ग्रंथ संग्रहाची दुरुक्ती टाळुण ग्रंथ संग्रह विकास करणे या हेतूने काम सुरू केले.

सुरुवातीच्या टप्यात तीन सहयोगी आणि ३१ संस्था या डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क सभासद होत्या. आज मितीस भारतभर ७१६३, भारत देशाच्य बाहेर २२ अशा या एकून ७१८५ संस्था या डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क च्या सभासद आहेत. महाराष्ट्र राज्यात डेलनेटच्या आज ९१३ संस्था सभासद आहेत.संस्थेचा विकास हा भारत अणि भारत बाहेर नेटवर्क प्रस्थापीत करण्या करीता केवल दिल्ली पुरते मर्यादीत न रहाता यावे, म्हणून १३ सप्टेम्बर २००० रोजी या संस्थेचे दिल्ली लायब्ररी नेटवर्क नाव बदलून त्याचे डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क (डेलनेट) असे करण्यात आले .

## डेलनेटची उद्दिष्टे

(१) सभासद असलेल्या ग्रंथालयांमध्ये अंतर ग्रंथालयं देवघेव द्वारे वाच साहित्य उपलब्ध करणे.

(२) सभासद ग्रंथालयातील वाचन साहित्याचा डेटाबेस (कॅटलॉग) नेटवर्कच्या माध्यमातून उपलब्ध करून देणे.

(३) माहिती शोध आणि माहिती वितरणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून त्या अनुषंगाने संशोधनात्मक कृती करणे.

(४) सभासद ग्रंथालयांना तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन करून कोणत्या प्रकारचे तंत्रज्ञान (हार्डवेअर, सॉफ्टवेअर कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी) आत्मसात करावे या संदर्भात कार्यवाही करणे.

(५) कार्यशाळा, परिषदा यांच्या माध्यमातून नेटवर्क ची उद्दिष्टे आणि एकूणच ग्रंथालय चळवळ माहिती तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने गतिमान करणे.

(६) विभागीय,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नेटवर्कस आणि ग्रंथालयांशी समन्वय ठेवून माहिती आणि वाचन साहित्याची आदलाबदल (Exchange) करणे.

## डेलनेटचे सभासदत्व

कोणतीही संस्था किंवा ग्रंथालय डेलनेट चे वाचन साहित्य संशोधन,संदर्भ, अभ्यासासाठी उपयोगात आणू इच्छित असेल आणि अशा संस्था /ग्रंथालयाकडे थोड्या फार प्रमाणात वाचनसाहित्याचा संग्रह असेल तर त्यांना सभासदत्व प्राप्त करून घेता येऊ शकते.

सुरुवातीच्या टप्यात तीन सहयोगी आणि ३१ संस्था या दिल्ली डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क च्या सभासद होत्या. आज मितीस दिल्लीत २९५ संस्था, भारतभर ७१६३, भारत देशाच्य बाहेर २२ अश्या एकून ७१८५ संस्था या डेलनेट च्या सभासद आहेत. महाराष्ट्र राज्यात डेलनेट च्या ९१३ संस्था सभासद आहेत.

भारतासह सार्क राष्ट्रात डेलनेट सभासदत्व असलेल्या सभासद संस्थेचा आलेख आपण नमूद केलेल्या कोष्टकाच्या माध्यमातून बघू या.



| भारता सह सार्क राष्ट्रात डेलनेट सभासदत्व असलेल्या सभासद संस्थेचा आलेख आणि सभासद नोंदणी शुक्ल तपशील (जी.एस.टी )करासह | |
|---|---|
| नोंदणी शुल्क | Rs.५,०००/- + १८% GST |
| सुरुवाती पासून सभासद असलेल्या सभासद संस्थेसाठी वर्गणी शुल्क | Rs.११,५००/- + १८% GST per annum |
| नव्याने सभासद होऊ इच्छीणाऱ्या संस्थेसाठी वर्गणी शुल्क | Rs.१६,५००/- + १८% GST (Admission Fee + Institutional Membership Fee) |
| सभासदत्व पुर्ननोंदणी शुल्क | Rs.११,५००/- + १८% GST |
| Non-SAARC Countries सार्क राष्ट्रे नसलेले देशासाठी शुल्क | |
| नोंदणी शुल्क | U.S. १००/- |
| सभासदत्व शुल्क | U.S. ५००/-per annum |

## डेलनेट डेटाबेस तपशील

डेलनेट सहभागी संस्थानमध्ये उपलब्ध असलेले वाचन साहित्य, मोफत नियतकालिके, ई-बुक्स शब्दकोश. पूर्ण आशय असलेले वैद्यक क्षेत्रातील पुस्तके आणि नियतकालिके असे कीती तरी साहित्य सहभागी सदस्य संस्थान करीता उपलब्ध करण्यात आलेले आहे. डेलनेटकडे उपलब्ध असलेल्या साधनांची (Resources) आकडेवारी पुढील प्रमाने आहे .

**डेलनेट डेटाबेस तपशील**

| अ.क्र | डेलनेट डेटाबेस तपशील | संख्या |
|---|---|---|
| (१) | Union Catalogue of Books -CCF | २,९२,७०,१५० |
| (२) | Union List of Current Periodicals | ३८,१८४ |
| (३) | Union Catalogue of Periodicals | २०,२३५ |
| (४) | Database of Periodical Articles | ११,०६,२२८ |

| | | |
|---|---|---|
| (५) | CD-ROM² Database | ६१,७५० |
| (६) | Union List of Video Recordings | ६,००० |
| (७) | Union List of Sound Recordings | १,०२५ |
| (८) | Database of Theses and Dissertations | १,३०,७५३ |
| (९) | Database of E-books | १६१३ |

## डेलनेट डेटाबेसेस

**पुस्तकाची संयुक्त तालिका :** डेलनेट सभासद ग्रंथालयांच्या वाचन साहीत्याच्या बिब्लिओ ग्राफिकल डीटेल्स ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून दिलेल्या आहेत. डेलनेट ने सभासद संस्था यांच्या साठी आज मीतीस २,९२,७०,१५० एवढे रेकोर्ड्स उपलब्ध करून दिलेले आहे .

**चालू नियतकालिकाची सयुंक्त यादी :** विज्ञान तंत्रज्ञान, समाज शास्त्र आणि मानव्य विद्या या विषयावरील चालु वर्षातील नियत कालिकांची यादी ऑनलाइन स्वरूपात वाचकांना उपलब्ध असते .ही यादी दरवर्षी परिपूर्ण केली जाते. सध्या ३८,१८४ एवढी नियतकालीके उपलब्ध असून Document Delivery साठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे .

**नियतकालिकांची संयुक्य तालिका :** या डेटाबेस मध्ये २०,२३५ एवढ्या रेकोर्डची माहिती असून या यातील संपूर्ण संच सभासद ग्रंथालयांकड़े उपलब्ध आहेत.

**नियतकालिकां मधील लेखांचा डेटाबेस :** या डेटाबेस मध्ये ११,०६,२२८ एवढे रेकोर्ड्स असून प्रत्येक लेखा करीता लेखक, शीर्षक, संकलन, नियतकलिकाचे शीर्षक, आणि विषयाचे नाव एवढे आशयाची माहिती देण्यात आलेली आहे. हां डेटाबेस तज्ज्ञ संशोधकांकडून मोठ्या प्रमाणात वापरण्यात येतो .

**सीडी रोम डेटाबेस :** या डेटाबेस मध्ये ६१,७५० एवढे रेकोर्ड्सची माहिती वाचकांना उपलब्ध होते. हे वाचन साहित्य सभासद ग्रंथाल्यांकड़े उपलब्ध आहे.



**व्हिडीओ रेकोर्डिंग संयुक्त तालिका :** या डेटाबेस मध्ये ६,००० एवढे व्हिडीओ रेकोर्डिंग कैसेट्सची यादी करण्यात आली आहे .

**साउंड रेकोर्डिंग संयुक्त यादी :** या संयुक्त यादी मध्ये सभासद ग्रंथाल्यांकड़े उपलब्ध असलेल्या १,०२५ एवढ्या रेकोर्डिंगची माहिती देण्यात आलेली आहे .

**प्रबंध आणि प्रबंधिका डेटाबेस :** भारतातील विद्यापीठा मधील सादर करण्यात आलेल्या विविध विषयांवरील सुमारे १,३०,७५३ एवढ्या वाचन साहीत्या करीता सूचीय माहिती तयार करण्यात आलेली आहे.

**वर्तमान पत्रांकरीता संयुक्त यादी :** या डेटाबेस मध्ये ७० वर्तमान पत्रांची माहीती उपलब्ध आहे. यामध्ये शीर्षक,संपादकांचे नाव, ते वर्तमान पत्र कोठून प्रकाशित होते, ई-मेलचा पत्ता, इंटरनेट आवृत्ती ची वेबसाईटचे संकेत स्थळ, इत्यादी माहिती दिलेली असते.

**ई-बुकचा डेटाबेस :** या मध्ये १६१३ ई-बुक्स चे रेकॉर्ड उपलब्ध आहेत.

**सहभागी ग्रंथालयांची माहिती :** डेलनेट उपक्रमा अंतर्गत सहभागी झालेल्या सर्व ग्रंथालयांच यादी दिलेली असून त्याद्वारे या ग्रंथालयांची माहिती प्रोफ़ाईल वाचकांना माहिती कळु शकते.

## वेगवेगळ्या इतर बाबींकरिता एक्सेस (Access)

खालील वाचन साहीत्या करीता अक्सेस देण्यात आला आहे.

(०१) केम्ब्रिज डिक्शनरी ऑनलाईन
(०२) Networked Digital Library of Thesis and Dissertation.
(०३) Online Dictionary of Library Information Science
(०४) GISTNIC DATABASE
(०५) MEDLINE AND other databases of NLM²
(०६) U.S Patent full Text
(०७) Full Text Medical journals
(०८) Open Access Journals
(०९) Engineering Technolgy e-Journals

(१०) Learning Resources for LIS professionals
(११) Digital Libraries of World

## डेलप्लस (Delplus) सॉफ्टवेअर

या संगणक प्रणाली अंतर्गत सर्व प्रकारच्या ग्रंथालयांचे संगणकीकरण करणे शक्य आहे. पुढील बदल देखील मोफत करून देण्यात येतात. MARC २१ आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानकानुसार रचना, बारकोडींग सुविधा उपलब्ध, एक्स्पोर्ट इम्पोर्ट, तालीकीकरण, देवघेव SPAC, प्रशासन, Authority Control, नियतकालिके निर्देश, अहवाल तयार करणे, ग्रंथ पडताळणी या मॉडयूल्सचा या प्रणालीत अंतर्भाव आहे. तसेच कोहा या प्रणालीचे वाचकांच्या गरजेनुसार Customised version उपलब्ध आहे.

## डेलनेटची प्रकाशने

डेलनेट न्यूज लेटर्स, नेक्लिन कार्यशाला परीषद प्रोसिडिंगस, डायरेक्टर रिपोर्टस, अशी विविध प्रकाशने डेलनेट ने प्रकाशित केलेली आहेत. आपल्या सभासद ग्रंथालयांना ही प्रकाशने पाठविण्यात येतात तसेच आता ती डेलनेट च्या संकेत स्थळावर देखील उपलब्ध करण्यात आलेली आहेत.

**डेलनेट कनसोरशिया :** कन्सोर्शिया च्या माध्यमातून डेलनेट ने खालील डेटाबेसेस उपलब्ध करून दिलेले आहेत .

(१) Infotrac Engineering,Science and Technology Collection (IESTC)
(२) Infotrac Pharmachy Collection (IPC)
(३) Infotrac Medical Collection (IMedc)
(४) Infotrac Health and Wellness Resource Centre (HWRC)
(५) Infotrac Educator's Reference Complete (ERC)
(६) BCRC+CAC(AICTE Mandated package-Managment)
(७) GREENR (AICTE Mandated packagea architecture / Enviromnetal Engineering)
(८) HTC+CAC(AICTE Mandated package-Hotel Managment ) National Georgaphic Magazine archive (NatGeo)



या कन्सोर्शियामुळे सभासद ग्रंथालय आवश्यक असलेले डेटाबेस करीता माफक दरात वर्गणी भरू शकतात.

## आंतर ग्रंथालयीन ग्रंथ देवघेव सेवा

सभासद असलेल्या ग्रंथालयांना डेटाबेस अर्थात कॅटलॉग डेलनेट च्या वेबसाईटवर उपलब्ध होत असतो. कोणत्या सभासद ग्रंथालयाकडे वाचन साहित्य उपलब्ध आहे याची माहिती मिळते. आंतर ग्रंथालयीन ग्रंथ देवघेव अंतर्गत करावयाची मागणी डेलनेट कार्यालयाकडे कळविण्यात येते, ज्या सभासद ग्रंथालयाकडे पुस्तके उपलब्ध आहे तेथून मागणी करणाऱ्या ग्रंथालयास पुस्तके पुरवण्यात येते. पुस्तके मागविण्याचा, परत करण्यासाठीचा खर्च संबंधित ग्रंथालयास (वाचन साहित्य मागणारे ग्रंथालय) यांना करावा लागतो. पोस्ट किंवा कुरियर मार्फत हे सर्विस हे साहित्य येत असते. No Library is an island या उक्तीप्रमाणे प्रत्येक ग्रंथालयात प्रकाशित होणारे सर्वच साहित्य उपलब्ध करणे केवळ अशक्य आहे. सभासद ग्रंथालयाच्या वाचन साहित्यसंग्रहातुन आंतरग्रंथालयीन ग्रंथालय देवघेवीच्या माध्यमातून ही गरज पूर्ण करण्यात येते. त्याच बरोबर ऑनलाइन स्वरूपातील डॉक्युमेंटरी डिलिव्हरी सर्विसेस पुरविण्यात येते.

## डेलनेट ऑनलाइन पद्धतीने कसे उपलब्ध होईल?






(१) www.delnet.in या वेबसाईटवर जावे.
(२) New Discovery Portal यावर क्लिक करावे.
(३) युजरनेम आणि पासवर्डची माहिती भरावी.
(४) त्यानंतर वेगळे डेटाबेसची उपलब्धी दिसेल.
(५) पुस्तकांच्या तालीकेसाठी किंवा नियतकालिकांच्या तालिकेसाठी शोध घेता येईल. Title, Author Subject, Service, Date of Publication, Place and Publisher, Corporate body, location etc, इत्यादी यापैकी कोणतीही एका फील्ड नुसार शोध घेता येऊ शकतो.
(६) जर्नल आर्टिकलसाठी डेलनेटला ई-मेल पाठवून पुर्ण सूचीय माहिती कळवल्यानंतर लेखाची उपलब्धी होऊ शकते.
(७) शोध घेताना (Searching ) a, an, the उपपदांचा वापर करू नये किंवा for, on, of या प्रकारच्या केवलप्रयोगी अव्यय यांचाही वापर करू नये.

## समारोप

डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क (डेलनेट)च्या माध्यमातून या योजनेत सहभागी झालेली ग्रंथालये आंतर ग्रंथालयीन देवदेव सुविधेच्या भौतिक स्वरूपात तसेच ऑनलाइन पद्धतीने लाभ घेतात. विशेषत: (AICTE) अंतर्गत असलेल्या शैक्षणिक संस्थांसाठी डेलनेट डेटाबेस आवश्यक केलेला असल्याने या संस्थांमधून त्याची उपलब्ध झालेली असल्यामुळे वाचकांची ज्ञानलालसा नेटवर्कच्या माध्यमातून पूर्ण होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने माहितीचे वितरण, आदान-



प्रदान, तांत्रिक आधार याबाबतीत डेलनेट ने चांगले कार्य केलेले आहे. या वार्षिक संमेलन आणि विभागीय पातळीवर कार्यशाळांच्या माध्यमातून देण्याची चळवळ अधिक व्यापक होत आहे.

नुकतेच डेलनेट ला सर्वोत्तम गुणवत्ता करीता पब्लिक सर्व्हीस साठीचा IIP- पुरस्कार भारताचे उपराष्ट्रपती यांचे हस्ते वर्ष २०२० मध्ये देऊन सन्मानीत केले गेले.

# इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे व्यवस्थापन : गरज आणि परिपूर्ती

रणजीत धर्मापुरीकर, माहिती शास्त्रज्ञ
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ. मेधा बसोले, ग्रंथपाल
केआरएम महिला कॉलेज, नांदेड

## प्रस्तावना

इलेक्ट्रॉनिक संसाधनाद्वारे माहिती सेवा देणाऱ्या ग्रंथपालांना आज अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. इलेक्ट्रॉनिक संसाधनांच्या भरमसाठ वाढीमुळे योग्य संसाधन निवडणे अवघड झाले आहे. खरेदीकरिता करावा लागणारा मोठा खर्च, ई-संसाधन निर्मात्याकडून अनेक प्रकारच्या व सतत बदलत जाणाऱ्या ई-संसाधनाचे पॅकेजेस देण्याचे आकर्षण, ई-संसाधन व्यावसायिकतेमधील बदलती कलात्मकता आणि या सर्वांना जोड आहे ती ई-संसाधनाचे व्यवस्थापन हाताळण्या जोगी सक्षम स्वयंचलित साधनांची कमतरता.

अशा परिस्थितीमध्ये इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे नियंत्रण करत असताना ग्रंथपाल हे स्प्रेडशिट, ई-मेल संदेशाच्या जंजाळात अडकलेले दिसतात. वेगवेगळ्या संगणक प्रणाली आणि डेटाकोष ज्या एकात्मिक नाहीत, याची जबाबदारी सांभाळण्याचे कार्य ते सध्या करत आहेत. अधिकतर ग्रंथपाल हे कार्य त्यांच्या अनुभवावर व तात्पुरत्या मिळालेल्या प्रशिक्षणाच्या आधारेच निभावून नेत आहेत.

सर्वसमावेशक व्यावसायिक पर्याय सध्या उपलब्ध नसल्यामुळे, काही नावाजलेल्या संस्थांनी स्वत: ई-संसाधन व्यवस्थापनाचे तंत्र विकसित केले आहे, काही या मार्गावर आहेत. काही व्यावसायिक व्हेंडरसुद्धा केवळ ई-संसाधनांच्या संग्रहाच्या व्यवस्थापनचे तंत्रच नाही, तर ग्रंथपालांना मदत व्हावी याचा भविष्यवेध घेऊन त्यात सुधारणा करण्याच्या कार्यात गुंतले आहेत.



## ग्रंथपालांची इलेक्ट्रॉनिक संसाधन व्यवस्थापनेतील भूमिका

प्रथम आपल्याला हे समजून घेणे गरजेचे आहे की, इलेक्ट्रॉनिक संसाधन म्हणजे संगणकाचा वापर करून डिजिटल स्वरूपात प्रसिद्ध केलेले साहित्य. यात स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक नियतकालिके, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, इलेक्ट्रॉनिक स्वरूपातले सारांश, निर्देश तसेच इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील मासिकांचा समूह ज्यामध्ये पूर्ण लेख व सारांश यांचा समावेश होतो. इलेक्ट्रॉनिक संसाधनेला जोड असते ती आंतरपृष्ठाची (इंटरफेस), ज्याच्या माध्यमातून आपल्याला इलेक्ट्रॉनिक संसाधने वापरणे शक्य होते. ही सर्व साधने वाचकांपर्यंत वेगवेगळ्या पद्धतीने पोहचतात.

- प्रकाशक स्वत:चे सर्व ई-जर्नल स्वत: या आंतरपृष्ठांमार्फत उपलब्ध करून देऊ शकतो.
- समजा एखाद्या प्रकाशन संस्थेचे ९० ई-जर्नल्स असतील, तर ग्रंथालय त्या सर्व ९० ई-जर्नल्सचे समवृत्त संच वितरकामार्फत विकत घेऊ शकतो अथवा वर्गणीदार होऊ शकतो.
- एखादा प्रकाशक दुसऱ्या प्रकाशकांच्या सर्व ई-जर्नल्सचे यजमानत्व स्वीकारू शकतो.
- एखाद्या वेळी वाचक सरळ एकच ई-मासिक प्रकाशकाच्या आंतरपृष्टामार्फत वाचू शकतो.
- काही वेळा प्रकाशक आपल्या एखाद्या ई-जर्नल्सचे हक्क एखाद्या वितरकाच्या आंतरपृष्टामार्फत देऊन टाकत असतो.

ई-संसाधनाची उपलब्धता व वापर संबंधित प्रकाशकाकडून घेऊन करता येतो. त्यात ई-संसाधन वापराचे नियम व अटी दिलेल्या असतात. यात प्रामुख्याने अधिकार, उपलब्धता, प्रशासन, वापर अशा अनेक अटी त्यात नमूद केल्या जातात. सहसा प्रिंट प्रलेखाच्या विकासात अशा प्रकारची परवाना सहमती नसते.

इलेक्ट्रॉनिक संसाधनांच्या व्यवस्थापनाचे नियोजन करत असताना नियोजकाने ई-संसाधनांच्या जीवनचक्राचा विचार करणे आवश्यक आहे. ई-संसाधनाच्या सेवा देताना नियोजकाने त्या प्रक्रियेबद्दल पूर्ण माहिती घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे उपार्जन, नूतनीकरण, वर्गणी, रद्द करणे. हे नियोजन भविष्यात कलात्मक, व्यावसायिक बदलाशी एकरूप होण्याच्या दृष्टिकोनातून अतिशय लवचीक पाहिजे.